# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/११/२०१६

**१) घरातील दाराचा ताला तोडुन सामानाची चोरी . :—**

दिनांक ०४+०५/११/२०१६ चे रात्र. दर. यातील फिर्यादी लोकेश भागवत शहारे रा. गणेश वार्ड शहापुर हे कुंटुबासह बाहेरगावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे राहते घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन तसेच घरा शेजारी राहणारे राजेश गुलाब मेश्राम वय ५० वर्ष यांचेपण घराचे समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घरातील लाकडी कपाडात ठेवलेली १ काळी गाठी व २ ग्रॅम डोरला मणी, काळी सोन्याची पोत २ नग अंदाजे ०५ ग्रॅम, चांदीच्या २ जोड पायपट्या २० तोळे व चांदीचे ३ जोडवे, चांदीचे ३ जोड जोडवे, चांदीचे ३ जोड कडे, १ डिव्हीडी प्लेअर, १ स्कुल बॅग व नगदी ९,०००/—रु. व मातीचे गल्यातील अंदाजे १०,०००/—रु. २ नोकीया कंपनीचे साधे मोबाईल, व आधार कार्ड व ईलेक्शन कार्ड तसेच मेश्राम यांचे घरुन १ एचपी कंपनीचा लॅपटॉप असा एकुण ५३,२००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन मारोती व्हॅन मध्ये जबरदस्तीने बसवुन नेवुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०५/११/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी रमेश परसराम मुटकुरे वय ६२ वर्ष, रा. खोकरला हा वरठी येथे जाण्या करीता शास्त्री चौकात आले असता तेव्हा त्या ठिकाणी आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीला आपल्या पांढ—या रंगाच्या मारोती व्हॅन मध्ये जबरदस्तीने बसवुन त्याला दाभा गावाचे शिवारात नेऊन रस्सीने गळयाला बांधुन जिवाने मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६५,३०७,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो. स्टे. भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक २८/१०/२०१६ रोजी २३.५५ ते २९/१०/२०१६ चे ०५.३० वा. दर. यातील फिर्यादी नरेंद्र भाऊराव बागडे वय २७ वर्ष, रा. बाजारीटोला शहापुर यांनी आपली हिरो होंडा स्पेलेंडर मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी १७१२ कि. २०,०००/—रु. ची घराच्या समोर खुल्या जागेत ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कडव पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन उभारीने डोक्यावर व पायावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०४/११/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील फिर्यादी श्रीकांत यांच्या मोठया वडीलांचा मुलगा मंगेश धनराज गजभिये रा. मच्छेरा तमाशाचा कार्यक्रम पाहत असतांनी आरोपी क्र. १ यांचेकडे जावुन तु आमच्या घरच्या पाहुण्यास का मारलास असे हटकले असता यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीच्या मोठे वडीलाच्या मुलास उभारीने व स्टील चे पट्टीने डोक्यावर व पायावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोगरे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलच्या निष्काळजीपणामुळे दोन जखमी व स्वत: मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . : —**

दिनांक ०५/११/२०१६ रोजी १९.१५ वा. दर. यातील फिर्यादी मो. हनिब शेख वय ४६ वर्ष, रा. गांधी नगर तहसील कार्यालय तुमसर हा आपल्या ऑटो क्र. एमएच ३५/२५०९ मध्ये सवारी बसवुन तुमसर येथुन देव्हाळीला जात असतांना विरुध्द दिशेने देव्हाळी ते तुमसर कडे येणा—या यातील आरोपी मृतक मोटार सायकल चालक —आयुश राजु पाटील वय २० वर्ष, रा. गोंदिया चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन लोकांच्या जिवास धोका निर्माण होईल या बेताने चालवुन ऑटोचे उजवे बाजुस धडक देवुन ऑटो मधील फिर्यादी व दोन सवारी इसमांना गंभिर जखमी करुन स्वत:चे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. हावरे पो. स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०५/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी, वरठी, गोबरवाही, पवनी, अडयाळ व भंडारा येथील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभट्टी दारु कि. २,४५०/—रू. व देशी दारु ९०० मिली लिटर देशी दारु कि. २,५०/—रु. तसेच जुगारातुन कि. ३,६३,०१०/—रु. चा माल असा एकुण कि. ३,६५,७१०/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.